# राज्यपालांची बदलती राजकीय भूमिका

**श्री. गोविंद देविदास साळुंके,** सहा. प्राध्यापक रसायनशास्त्र विभाग ,राजे रामराव महाविद्यालय जत जि सांगली , संपर्क – ९६६५५८९०६३, ई-मेल – govindsalunke1990@gmail.com

---

**प्रस्तावना :** भारतीय संविधानानुसार केंद्राप्रमाणेच घटक राज्यात देखील संसदीय शासन प्रणालीच्या पुरस्कार भाग सहा कलम १५३ ते १६७ पर्यंत राज्यातील कार्यकारी विभागाशी निगडित आहेत. यामध्ये राज्यपाल मुख्यमंत्री व त्यांचे मित्रमंडळ तसेच महाधिवक्ता यांचा समावेश होतो. अशी दुहेरी भूमिका त्यांना पार पाडावी लागते. आधुनिक राज्यव्यवस्थेत ते त्यांची भूमिका बजावताना त्यांच्यावरील केंद्राचा दबाव आपणास ठळकपणे एक सजग नागरिक म्हणून दृष्टीक्षेपात येत आहेत. त्यांची बदलणारी राजकीय भूमिका आपणास निश्चितच विचार करायला भाग पडते.

**उद्दिष्टे :** १) राज्यपालांची निवड प्रक्रिया समजून घेणे.
२) राज्यपालांची घटनात्मक पात्रता समजून घेणे.
३) राज्यपालाचे कार्यकारी अधिकार समजून घेणे.
४) राज्यपालांचे घटनात्मक अधिकार समजून घेणे.
५) राज्यपालांचे आधुनिक राजकीय भूमिका समजून घेणे.

**राज्यपालाची नियुक्ती** : राष्ट्रपतींच्या सहीने राज्यपालांची नियुक्ती होते. म्हणजेच एक प्रकारे ते केंद्र सरकार नियुक्त प्रतिनिधी असतो. मात्र सन १९७९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावरून असे स्पष्ट होते की, राज्यपाल पद हे केंद्र शासनाची नोकरी नसून ते एक घटनात्मक पद आहे पद आहे. ते केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली किंवा केंद्र शासनास दुय्यम नाही.

**राज्यपालाची पात्रता :**
१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
२) ती व्यक्ती वय वर्ष 35 पूर्ण करणारी असावी.
या व्यतिरिक्त काही संकेत व परंपरा यानुसार दोन निकष स्पष्ट केले आहेत.
अ) स्थानिक राजकारणापासून अलिप्त राहण्यासाठी ती व्यक्ती बाहेरील राज्यातील असावी.
ब) राज्यपाल नियुक्ती वेळी राष्ट्रपती संबंधित घटक राज्याच्या मुख्यमंत्र्याची विचारविनिमय करतील. (बहुतांश वेळा या संकेतांचे उल्लंघन झाले आहे.)

**राज्यपालांचा कार्यकाल :** १) पदग्रहण केल्यापासून ती व्यक्ती पाच वर्षे पदावर राहू शकते. मात्र हा कार्यकाल राष्ट्रपतींच्या मर्जीवर अवलंबून असतो.
२) राष्ट्रपतींची मर्जी याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येत नाही. राज्यपाल पदास कार्यकाळाची सुरक्षा नाही. राष्ट्रपती त्याला कधीही पदावरून दूर करू शकतात.
३) विशेष म्हणजे राष्ट्रपती त्यांना कोणत्या कारणावरून दूर करणार आहेत हे नमूद केलेले नाहीत.
इतिहासात :
व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली शासनाने सर्व राज्यपालांना राजीनामा द्यायला सांगितले होते. कारण त्यांची नियुक्ती ही काँग्रेस शासनाने केली होती. याचीच पुनरावृत्ती पी. व्ही. नरसिंहराव यांच्या शासनाने १४ राज्यपालांना पदावरून दूर करून गेली.

**राज्यपालाची कायदेविषयक अधिकार :** १) राज्यपाल हे विधिमंडळाचे अधिवेशन बोलणे व बरखास्त करू शकतात. तसेच विधानसभा विसर्जित करू शकतात.
२) विधिमंडळाच्या अधिवेशनास अभिभाषणाद्वारे संबोधित करतात.
३) विधान परिषदेवर एक षष्टांश सदस्य नियुक्त करतात.
४) अँग्लो इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधित्व न मिळाल्यास एक सदस्यांची नियुक्ती विधानसभेवर करतात.
५) राष्ट्रीय निवडणूक आयोगाशी विचार विनिमय करुन विधिमंडळ सदस्य अपात्रतेविषयी निर्णय घेतात.
६) राज्यपाल राज्य लोकसेवा आयोग, वित्त आयोग, भारतात कॅग, यांचे अहवाल विधिमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था करतो.

**घटनात्मक अधिकार :** कलम १५४ - घटक राज्याचे कार्यकारी अधिकार राज्यपालाकडे असतील.

कलम १६३ - राज्यपालांची कार्य पूर्ण करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्री व मित्रमंडळाचे तरतूद केले आहे.
कलम १६४ - मित्रमंडळ संयुक्तरित्या विधानसभेस जबाबदार असते.
मित्रमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे. ( ४२ वी घटना दुरुस्ती १९७६ ) पण राज्यपालांच्या बाबतीत अशी तरतूद नाही.
कलम १६३ - अन्वये राज्यपालास विवेकाधिकार प्राप्त होतो.

**राज्यपालांची बदलती राजकीय भूमिका :**

१) महाराष्ट्र : ऑक्टोंबर 2019 मध्ये संपन्न झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेना-भाजप निवडणूक पूर्व युती ने स्पष्ट बहुमत प्राप्त केले मात्र काही मतभेदांमुळे त्यांना सत्ता स्थापन करता आली नाही.अशावेळी महाराष्ट्रचे राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी यांनी काही दिवसानंतर सर्व संकेत परंपरा यांचे उल्लंघन करून राज्यात घटनात्मक आणीबाणी लागू करावी अशी शिफारस केली. तब्बल 21 दिवसांच्या घटनात्मक आणि नंतर भल्या पहाटे राष्ट्रपती राजवट हटवून श्री.देवेंद्र फडणीस यांना व श्री. अजित पवार यांना अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदाची शपथ देऊ केली. सदर घटनेविरुद्ध अन्य राजकीय पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागून झालेला अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. व बहुमत सिद्ध न झाल्याने श्री. देवेंद्र फडवणीस यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. मात्र या तीन दिवसाच्या आपत्कालीन सरकारच्या निर्मितीत राज्यपालाची भूमिका अधोरेखित झाली.

२) कर्नाटक : दक्षिण भारतातील राजकीयदृष्ट्या अस्थिर असलेल्या कर्नाटकात गती वर्षी खूप मोठे राजकीय स्थित्यंतरण घडून आले. बहुमत प्राप्त काँग्रेस व निजद या आघाडी शासनातील १५ ते १६ आमदार फोडून शासन अस्थिर केले. या सर्व घडामोडीत राज्यपाल वजूभाई वाला यांची भूमिका विवादास्पद आढळली. व एच. डी. कुमारस्वामी मुख्यमंत्री पदावरून दूर झाले व बी. एस.येडीयुराप्पा भाजप शासन सत्तेवर येऊन दक्षिण विजय साध्य झाला.

३) गोवा : सदर राज्य हे सर्वच बाबतीत लहान असून राजकीय अस्थिरता त्याच्या पाचवीला पूजल्या प्रमाणेच आहे. सन २०१७ मध्ये सर्वात मोठा काँग्रेस पक्षास आमंत्रण न देता भाजपाच्या नेतृत्वाखाली आघाडी शासन स्थापन करण्यात राज्यपाल श्रीमती. मृदुला सिन्हा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. राजकीय अस्थैर्य दूर करण्यासाठी श्री. मनोहर पर्रीकर यांना केंद्रीय संरक्षणमंत्री पदाचा राजीनामा देऊन गोव्यात परतावे लागले.

४) मनिपुर व नागालँड : ईशान्येकडील मणिपूर व नागालँड या लहान राज्यात देखील वरील प्रमाणेच राजकीय अस्थितीची परिस्थिती निर्माण झाली. व भाजपा सत्तेवर आली. या परिस्थितीत देखील येथील राज्यपालाची भूमिका देखील विवादास्पद आढळली.

**सारांश :** अशाप्रकारे घटक राज्यातील प्रमुख घटनात्मक व्यक्ती असलेले राज्यपाल व त्यांची बदलती राजकीय भूमिका ही आपणास एक सजग नागरिक म्हणून अस्वस्थ करणारे आहे. म्हणजेच राज्यपाल पद हे केंद्र शासनाचे कर्मचारी असल्याप्रमाणेच भूमिका बजावत. हे लोकशाही स्थिरी करण्यास अत्यंत घातक आहे. केंद्र व राज्य यांच्या घटनात्मक अभ्यास केल्यास राज्यातील घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यपालांवर असणारा केंद्राचा दबाव अधोरेखित होतो. अगदी स्वातंत्र्योत्तर काळापासून ते ही राजकीय परंपरा चालत आली आहे. मग केंद्रात शासन कोणत्याही विचार धारेचा असो आपल्या विचारधारेचे शासन राज्यात देखील असावे म्हणून केंद्राद्वारे वरील प्रमाणे राज्यपालांवर नैतिक दबाव आणून घटनाबाह्य राजकीय कृती घडत आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना नसलेली पदाची सुरक्षितता ही पद्धती निश्चितच प्रगल्भ लोकशाहीस धोका पोहचविणारी आहेत.

**संदर्भ :** १) इंडियन पोलिटी, एम.लक्ष्मीकांत, श्रीकांत गोखले (मराठी अनुवाद), के. सागर प्रकाशन, पुणे.२०१७.
२) भारताचे शासन व राजकारण, भा.ल.भोळे, पिंपळपुरे प्रकाशन,नागपूर.ऑगस्ट २०१४.
३) दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. तरुण भारत.
४) बी. बी. सी. मराठी, वार्ता. वाहिनी.